www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 274 | वा बुधवार दि. 18 जून २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून
शासनाच्या दरबारात

### कचऱ्याचा ढिगारा लादी कामामुळे, रहिवाशांना त्रास





**जोगेश्वरी (पूर्व), दि. १७ जून २०२५ – गांधीनगर (बि वॉर्ड) येथील चाळींमध्ये सुरू असलेल्या लादीकरणाच्या कामामुळे परिसरात कचऱ्याचा मोठा ढिग निर्माण झाला आहे. संबंधित कंत्राटदाराने मलबा आणि लादी थेट कचरा कुंडीजवळ टाकल्याने कचरा उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांना अडथळा निर्माण होत आहे.**

दैनिक युवक आधार
किशोर गुडेकर
मुंबई विभाग प्रमुख

**यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, गांधी नगर येथील BMC शाळेच्या विद्यार्थ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. रहिवाशांनी संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून परिसर स्वच्छ करण्याची मागणी केली आहे.**

# तीन लाख लोकसंख्या, पण एकही पेट्रोलपंप नाही!

## घराघरात पेट्रोल डिझेल विक्रीचं 'स्मार्ट सिटी'चं भयाण वास्तव!

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

एकीकडे उलवे नोड 'नवी मुंबई स्मार्ट सिटी'चा डंका पिटतोय, दुसरीकडे इथल्या ३लाख रहिवाशांना आजही साध्या पेट्रोल पंपासाठी बेलापूर, नेरुळ आणि पनवेलकडे धाव घ्यावी लागतेय! प्रशासन, सिडको आणि महापालिकेच्या बेजबाबदार नियोजनाचा हा थेट परिणाम असून, आज उलवे परिसरात जणू बेकायदेशीर पेट्रोल-डिझेल विक्रीचं नवा 'उद्योगधंदा' सुरू झालाय! उलवे नोडमध्ये सिडकोने तीन ठिकाणी पेट्रोल पंपासाठी जागा आरक्षित करूनही एकाही ठिकाणी पंप सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांना दररोज वाहनासाठी पनवेल-नेरुळपर्यंत इंधन भरण्यासाठी प्रवास करावा लागतो. वेळ, पैसा



आणि इंधन असा तिहेरी फटका सामान्य नागरिकांच्या गळ्यात पडतोय. त्यातूनच इथल्या गल्ल्यागल्ल्यांमध्ये पेट्रोल-डिझेलच्या बेकायदेशीर विक्रीचं जाळं उभं राहिलंय. किराणा दुकानं, गॅरेजेस, भंगारात कुठेही ड्रम भरून ज्वलनशील द्रव्यांचा साठा केला जातोय. बाटल्यांमधून पेट्रोल विकलं जातंय. हा प्रकार केवळ बेकायदेशीरच नव्हे, तर धोकादायक आणि जीवघेणाही ठरतोय काही महिन्यांपूर्वी उलवेच्या जावळे गावात घडलेली दुर्घटना अजूनही विसरता येणार नाही. एका किराणा दुकानात गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन प्रचंड आग लागली. या आगीत एका आईसह तिच्या दोन लहान मुलांचा होरपळून मृत्यू झाला. आणखी एक जण गंभीर जखमी झाला. चौकशीत निष्पन्न झालं की, त्या दुकानात मोठ्या प्रमाणावर ज्वलनशील पदार्थ साठवलेले होते, उलवेमध्ये पेट्रोल-डिझेलची बाटली विक्री सर्रास सुरू आहे. अग्निशमन नियम, पोलीस नियंत्रण, सिडकोचं नियोजन सगळ्याला हरताळ फासणाऱ्या या परिस्थितीकडे प्रशासन डोळेझाक करतंय. मात्र एखादी दुर्घटना घडली की राजकीय फोटोसेशन सुरू होतं. उलवेतील नागरिकांनी आता थेट प्रशासनाकडे मागणी केली आहे. तात्काळ अधिकृत पेट्रोल पंप सुरू करावेत, अवैध इंधन विक्री बंद करून जबाबदारांवर कडक कारवाई करावी, ज्वलनशील पदार्थ साठवणाऱ्या ठिकाणी धाडसत्र राबवून परिसर सुरक्षित करावा, हा मुद्दा केवळ सुविधा किंवा असुविधेचा नाही. हा मुद्दा सुरक्षेचा आहे. जिवितहानीचा आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली केवळ रस्ते व इमारती उभारणं म्हणजे 'विकास' नव्हे. इथल्या नागरिकांना मूलभूत गरजाही न मिळणं हे अपयश नाही, तर थेट अन्याय आहे! उलवे नोडच्या नागरिकांना आता केवळ निवेदनं देऊन समाधान मानायचं नाही, तर मोठं जनआंदोलन उभं करायचं आहे. असे प्रकार थांबवण्यासाठी आता पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक मंडळी व नागरिकांनी एकत्र येऊन लढा उभारण्याची वेळ आली आहे.

# भाजपची कोकण विभागीय आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गेल्या ११ वर्षांतील मोदी सरकारच्या कार्यकाळात भारताने विकास, आत्मनिर्भरता आणि जागतिक नेतृत्वाच्या दिशेने भक्कम पावले टाकली आहेत. 'संकल्प से सिद्धि तक' या प्रेरणादायी संकल्पनेवर आधारित, केंद्र सरकारच्या यशस्वी कामगिरीचा लेखाजोखा महाराष्ट्रातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प भाजपा महाराष्ट्र प्रदेशने हाती घेतला आहे. या अभियानाच्या अनुषंगाने ठाणे-कोकण विभागीय आढावा बैठक प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत खांदा कॉलनी मधील सीकेटी महाविद्यालयात संपन्न झाली. या बैठकीत कोकणातील संघटनात्मक बांधणी, बूथ पातळीवरील व्यवस्थापन तसेच लोकांपर्यंत प्रभावीपणे संवाद साधण्याच्या रणनीतीवर सखोल चर्चा झाली. कमळ हे केवळ चिन्ह नसून, भाजपाच्या विचारसरणीचे प्रतीक आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या वेशात कमळ परिधान करून अभिमानाने भाजपा प्रतिनिधित्व करावे. आणि मोदी सरकारच्या विकासकार्यांचा घरोघरी प्रचार करणे ही काळाची गरज आहे आणि हे कार्य प्रत्येक कार्यकर्त्याने स्वतःचे दायित्व समजून पार पाडावे अशा सूचना उपस्थितांना करण्यात आली. हे अभियान म्हणजे केवळ माहितीप्रसार नव्हे, तर एक जनतेशी भावनिक नातं निर्माण करण्याचा संकल्प आहे ज्यातून २०२४ नंतरची नवी भारतनिर्मिती अधिक भक्कम होणार आहे, असेही रवींद्र चव्हाण यांनी म्हंटले.




या बैठकीला खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, कोकण विभागीय संघटन मंत्री शैलेंद्र दळवी, भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, सरचिटणीस दिपक बेहरे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, खोपोली शहर मंडळ अध्यक्ष राहूल जाधव, खालापूर पूर्व मंडल अध्यक्ष सनी यादव, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, विकास खुरपूडे, चंद्रप्पा अनिवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. दरम्यान कार्यक्रमावेळी खोपोली नगरपालिका क्षेत्रातील उद्योजक यशवंत साबळे, सुहास वझरकर, मंगेश सुर्वे, युवा उद्योजक विक्रम साबळे, अजिंक्य तावडे, माजी नगरसेवक अविनाश तावडे, गगणगिरी मित्र मंडळ अध्यक्ष महेंद्र खोत, सामाजिक कार्यकर्ते दिलीप देशमुख, सामाजिक कार्यकर्ते भिमा मोरे, ईरशाद खान, चिराग रावळ, अतूल पवार यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहिर पक्ष प्रवेश केला. त्यांचे भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी सर्व प्रवेश कर्त्यांचे पक्षात स्वागत केले.






स्कूल चले हम :- सिल्लोड तालुक्यातील इरा नेक्सस इंटरनॅशनल स्कूलचे विद्यार्थी शाळेच्या पहिल्या दिवसाच्या स्वागताने भारावले..! विघ्नहर्ता गणपती बाप्पाचे पुजन करून विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**( दैनिक युवक आधार - योगेश पालोदकर )**

# पत्रकार मित्र असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार ऍड. मनोहर सचदेव यांनी वाढदिवशी जपली सामाजिक बांधिलकी

## वाढदिवसानिमित्त गरजू विदयार्थ्यांना केले शालेय दप्तर वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

वाढदिवस म्हंटले की प्रत्येक माणसाच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण. यादिवशी प्रत्येकजण विविध माध्यमातून आपला वाढदिवस साजरा करत असतो. अनेक जण यादिवशी मोठमोठ्या पार्टीचे आयोजन करून देखील आपला वाढदिवस साजरा करीत असतात. मात्र पत्रकार मित्र असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार ऍड. मनोहर सचदेव यांनी आपला वाढदिवस सामाजिक कार्यक्रम करून साजरा केला.



यावेळी पत्रकार मित्र असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार व श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टचे अध्यक्ष ऍड. मनोहर सचदेव यांनी अत्यंत गरजू मुलांना शालेय दप्तर व वह्यांचे वाटप पूज्यसिंधी पंचायत सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष केवल महाडिक, जेष्ठ पत्रकार संजय कदम, पत्रकार संदीप मुळीक, पत्रकार डॉन के. के., समाजसेवक रवींद्र पाटील, अल्पेश खंडागळे, अनुराग वाघचौरे यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.






## दिवंगत राष्ट्रवादी काँग्रेस नेते प्रशांत पाटील (भाऊ) यांचा प्रथम स्मृतिदिन २० जून रोजी

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील ऊर्फ भाऊ यांचा प्रथम स्मृतिदिन शुक्रवार, दि20 जून 2025 रोजी मल्टिपर्पज हॉल, जेएनपीटी टाऊनशीप, उरण येथे सकाळी 10 ते 12 या वेळेत भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. राजकीय पटलावर धाडसी, आक्रमक, अभ्यासू नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे प्रशांत पाटील यांचे 20 जून 2024रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे ते निकटवर्तीय सहकारी होते. त्यांच्या अचानक जाण्याने केवळ पक्षाचाच नव्हे, तर महाविकास आघाडीचाही मोठा आधार हरपला असल्याचे मानले जाते. उरण आणि रायगड जिल्ह्यात "भाऊ" या नावाने परिचित असलेले प्रशांत पाटील हे कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय व जनतेमध्ये विश्वासार्ह चेहरा म्हणून ओळखले जात होते.त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त, आदरांजली स्वरूपात भक्तिमय भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन जेएनपीटी पोर्ट अथॉरिटीचे बोर्ड मेंबर दिनेश पाटील यांनी केले असून, त्यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात ही माहिती नमूद करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र राज्यातील रुग्णवाहिका चालक-मालक यांच्यासाठी शासन दरबारी महाशक्ती अँब्युलन्स असोसिएशनने मांडली मागणी

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे**
**सह संपादक**

राज्यातील रुग्णवाहिका चालक व मालक यांच्या समस्या सोडविण्यासाठी महाशक्ती अँब्युलन्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांनी शासनाकडे विविध मागण्या सादर केल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील अम्बुलन्स चालक मालक यांच्यावतीने महाशक्ती असोसिएशनचे विविध जिल्ह्यातील पदाधिकारी यांनी एकत्र येऊन महाराष्ट्र शासनाचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे खाजगी सचिव अनिकेत मानोरकर यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे परिवहन विभागाचे राज्यमंत्री माधुरी ताई मिसाळ यांच्याकडेही त्या स्वरूपाचे पत्र देण्यात आली आहे. आणि माधुरीताई यांनी आपण नक्कीच विचार करून इतर माहिती घेऊन कारवाई करण्याचे आदेश देऊन आपल्या बाकी खाली दिल्याप्रमाणे इतर मागण्यांचा विचारही करण्याची आश्वासन दिले. या निवेदनात रुग्णवाहिका चालक व मालक यांच्यासमोर निर्माण झालेल्या आर्थिक, सामाजिक व प्रशासकीय अडचणींचा आढावा घेण्यात आला आहे. मागण्यांमध्ये मुख्यतः खालील बाबींचा समावेश आहे: रुग्णवाहिका सेवेसाठी दर निश्चित करावेत. या क्षेत्रासाठी महामंडळ स्थापन करून असोसिएशनच्या प्रतिनिधीला सदस्यत्व द्यावे. रुग्णवाहिका सेवा खासगी सेवा नसून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा भाग असल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळावा रुग्णवाहिकांवरील इंधन, टोल, विमा, पाणी पुरवठा यावर सवलत द्यावी. वाहनचालकांसाठी आरोग्य व अपघात विमा, सेवानिवृत्ती योजना लागू कराव्यात. अपघातग्रस्त वा मृत्यूमुखी पडलेल्या चालक कुटुंबीयांना तत्काळ शासकीय मदत मिळावी. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शरद कात्रजकर, सचिव अर्जुन चव्हाण, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष मुकुंद कांबळे,मुंबई संपर्कप्रमुख संतोष मोहिते यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या काही वर्षांत रुग्णवाहिका चालविणाऱ्यांना कोणतीही सवलत मिळालेली नाही. शासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन त्वरित निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. याची दुसरी प्रत परिवहन विभागाचे राज्यमंत्री माधुरी ताई मिसाळ यांच्याकडे सुद्धा देण्यात आली आहे.



## सुदाम भोईर शिवसेना विभागप्रमुख व समाज सेवक यांच्या मार्गदर्शनाखाली शालीय मुलांना साहित्य खाऊ वाटप

**दै युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

सुदाम भोईर साहेब समाज सेवक यांनी दहागाव येथे शालीय मुलांना खाऊ वह्या पेन वाटप केले सुदाम भोईर साहेब हे कल्याण मुरबाड टिटवाळा रायते गोवेली खेडेपाडयात वस्तीत जाऊन आपली फुल नाही तर फुलांची पाकळी देउन नेहमीच मदतीचा हात देऊन आपली सेवा दर साला प्रमाने यंदाही आपली सेवा करण्यात आली आहे सुदाम भोईर साहेब हे सध्या ग्रामीणीक भागांमध्ये ते नेहमी च चर्चेमध्ये असतात शाळेत कुणाचा पहिला नंबर आला आणि हि बातमी त्यांना जर समजली की ते ताबडतोब आपले सहकारी घेउन आपल्या स्वतःच्या खर्चाने जे घ्यायचे सन्मान वस्तुच ते घेतात आणि आपलीं समाज सेवा ते प्रमाणिक पणाने ते करतात आज दहागाव येथे भरपावसात जाऊन आपली सेवा दर वर्षी प्रमाणे केली आहे कार्यक्रमांचे अध्यक्ष भास्कर टेंभे शिवसेना शाखाप्रमुख रायते जयराम रोहणे समाज सेवक मोतीराम मिरकुटे शिवसेना शाखा प्रमुख दहागाव चिंतामण समाज सेवक ज्ञानेश्वर मिरकुटे आणि अक्षय मिरकुटे यांनी सर्व कार्यक्रमांची शोभा वाढवली आलेले प्रमुख पाहुण्यांचे आभारप्रदर्शन केले



## आषाढी एकादशी २०२५: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विठ्ठल मंदिर समितीकडून शासकीय महापूजेसाठी औपचारिक निमंत्रण

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना येत्या रविवारी, दिनांक ६ जुलै २०२५ रोजी होणाऱ्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी औपचारिक निमंत्रण देण्यात आले आहे. वारकरी संप्रदायाचा पवित्र आणि गौरवशाली सोहळा असलेल्या आषाढी एकादशीच्या दिवशी दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्य सरकारतर्फे महापूजेचा कार्यक्रम होणार आहे. मुख्यमंत्र्यांकडून विठोबा-रुक्मिणीची शासकीय वतीने महापूजा करण्याची परंपरा असून यंदाही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पहाटे महाअभिषेक, पुष्पार्चन आणि महाआरती होणार आहे. मंदिर समितीने यासाठी सर्व नियोजन पूर्ण केले असून यंदा कोरोनानंतरचा संपूर्ण निर्बंधमुक्त पहिला एकादशी सोहळा असल्याने पंढरपूरात भाविकांची विक्रमी गर्दी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरवर्षीप्रमाणे राज्यातील विविध भागांमधून पालख्या, दिंड्या, वारकरी आणि भक्तगण पंढरपूरकडे प्रचंड उत्साहात निघाले आहेत. संत तुकाराम महाराज पालखी, संत ज्ञानेश्वर महाराज पालखीसह इतर संतांच्या पालख्या सध्या मार्गस्थ असून ४ जुलैच्या सुमारास त्या पंढरपूरात दाखल होणार आहेत.



स्थानिक प्रशासन, मंदिर समिती, पोलीस यंत्रणा आणि आरोग्य विभाग यांच्याकडून यंदा सुरक्षा, वाहतूक, स्वच्छता आणि आरोग्य सेवा या बाबतीत विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मंदिर परिसरात सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरे आणि आपत्कालीन वैद्यकीय टीम तैनात करण्यात आली आहे. रेल्वे, एसटी महामंडळ आणि खासगी वाहतूकदारांनीही विशेष सेवा पुरवण्याचे नियोजन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह काही मंत्री, लोकप्रतिनिधी, आणि नामवंत व्यक्तींसुद्धा या दिवशी दर्शनासाठी उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळते.

वारकऱ्यांचा 'माऊली'वर श्रद्धेचा महासागर दरवर्षीप्रमाणे यंदाही पंढरपूरात उसळणार असून "ज्ञानोबा-तुकोबा", "विठोबा रखुमाईच्या जयघोषाने" पंढरपूर नगरी गगनभेदी होणार आहे.

# दोस्त' संस्थेची अवयवदान, आरोग्य सेवा दिंडी पंढरीकडे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

आषाढी वारी सोहळ्यादरम्यान 'दोस्त' मुंबई या संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे अवयवदान व आरोग्य सेवा दिंडीचे आयोजन करण्यात आले असून ह्या दिंडीचा प्रस्थान सोहळा कामोठे येथील वेस्टर्न हिल्स हायस्कुलच्या प्रांगणात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार प्रमोद चुंचुवार, कामोठे डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष व बालरोगतज्ज्ञ डॉ संतोष कानगुले, आरोग्य सेवेतील कक्ष अधिकारी, लेखक वैभव मोहन पाटील तसेच पनवेल मनपाचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम जनार्दन म्हात्रे, सतीश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

'दोस्त चे संस्थापक डॉ कैलास जवादे यांनी संस्थेच्या कार्याचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडताना संस्थेची आजवरची वाटचाल व भविष्यातील नियोजनाविषयी - माहिती दिली. 'दोस्त'च्या कार्यकर्त्यांनी अवयवदान चळवळीतील दोन भन्नाट पथनाट्ये सादर करत अवयव दानाबाबत जनजागृती केली. गेल्या 11 वर्षांपासून 'दोस्त' संस्थेमार्फत ह्या आरोग्य दिंडीचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमादरम्यान वारीमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती आणि आरोग्यविषयक कार्यक्रम राबविण्यात येतात. यामध्ये कॅन्सर जनजागृती, लिव्हर किडनी व पचन संस्था आरोग्य कार्यक्रम, वैद्यकीय शिबीर, चरण सेवा, शस्त्रक्रिया सल्ला, फायब्रोस्कॅन तपासणी इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात. कामोठे डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने दोस्त संस्थेसाठी आर्थिक मदतीचा धनादेशदेखील याप्रसंगी देऊन वारीतील आरोग्य सेवेस हातभार लावण्यात आला. लेखक वैभव पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात आरोग्य दिंडी दरम्यान अवयवदानाबरोबरच संसर्गजन्य, असंसर्गजन्य आजार तसेच कोविड बाबत जनजागृती करण्याचा सल्ला संस्थेच्या उपस्थित विद्यार्थी-कार्यकर्त्यांना दिला. भाषणाच्या शेवटी वैभव पाटील यांनी अवयव दान जनजागृतीपर स्वलिखित कविता सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. यावेळी पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे व सतीश पाटील यांनीदेखील मनोगते सादर केली ज्यात त्यांनी 'दोस्त'च्या कार्याचे कौतुक करत त्यांना आवश्यक ते सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. जेष्ठ पत्रकार, गांधी विचाराचे अभ्यासक आणि संवेदनशील, समाजभान असलेले व्यक्तिमत्व प्रमोद चुंचुवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अवयवदानाबाबत अनुभव कथन करत अवयवदानाची ही चळवळ अधिक व्यापक होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ जवादे यांनी केले आणि पसायदानाने सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## जि प कें प्रा शाळेत पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुं निकाळजे (जाफ्राबाद )**


जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पहिल्याच दिवशी नवीन विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षकांनी पहिलीत नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यासोबत शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले यावेळी उपस्थित मुख्याध्यापक खंडेलवाल सर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद तेलंग्रे , बंडू महाराज, रामभाऊ सुरडकर, प्रदीप नरवाडे , सुनील निकाळजे, शरद म्हस्के, देवेंद्र दामधर, गजानन उखळकर सर, अंभोरे सर, सोळंके सर, जंजाळ सर, मुळे सर, वाघ सर, पंडित सर, अमर सर, उखळकर मॅडम, चव्हाण मॅडम, सोळंके मॅडम, आदी शिक्षक वर्ग कर्मचारी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते




## केटीएसपी मंडळाच्या अनागोंदी कारभारावर साबळे यांचा स्ट्राइक वॉर .... विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळू देणार नाही ; उपाययोजना न केल्यास भाजप तर्फे उपोषण आंदोलन ...यशवंत शेठ साबळे

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

भाजपचे डॅशिंग नेतृत्व यशवंत शेठ साबळे यांनी स्वतः स्ट्राइक वर येताच विद्यार्थ्यांच्या , भवितव्याशी जीवाशी खेळ खेळणाऱ्या गंभीर स्वरूपाच्या मुद्द्याला हात घालत केटीएसपी मंडळ शिष्यमंदिर शालेय व्यवस्थापनेच्या अनागोंदी बेजबाबदार कामकाजावर चिंता व्यक्त करत अनेक तांत्रिक मुद्द्यांवर तातडीने उपयोजना होण्यासाठी महत्वपूर्ण चर्चा केली . जनसामान्यांच्या संघर्षातील योद्धा म्हणून यशवंत साबळे यांचा घनाघात रुद्र रूप पाहता अनेक नागरिकांनी, पालकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्या लढ्याचे समर्थन केले व जनतेच्या मनातील प्रश्नांना भावनांना आज कोणी तरी निर्भीड पणे मांडत जाब वीचारल्याने समाधान व्यक्त केले. भाजपात प्रवेश केल्यानंतर पहिलाच मास्टर स्ट्रोक मारत खोपोलीकरांच्या मनातील लोक नेतृत्व म्हणून आज साबळे यांनी विश्वास संपादित केले. शालेय व्यवस्थापनेतील अनेक अडचणी, तक्रारी पहाता असंख्य पालकांच्या तक्रारीनंतर आम्ही अनेकदा



सूचना करून ही जर दुर्लक्ष करत असाल तर शेकडो विद्यार्थ्यांचे जीव आम्ही असे धोक्यात घालू शकत नाही असे ठमकावून सांगितले . असंवेदनशील पणे वागू नका , मुलांच्या जीवाशी खेळू नका .. के टी एस पी मंडळाच्या अनागोंदी कारभाराचे पाडे वाचून खूप झाले आता ट्विट ऍक्शन झाली पाहीजेल असे सांगत साबळे यांनी अनेक मुद्द्यांना वाचा फोडली. असुरक्षित , अपघात जन्य परिस्थितीत शाळा सुरू होऊ नये शिशु मंदिरच्या अनेक वर्गाचे काम अपूर्ण असुरक्षित आहे याबाबत चिंता व्यक्त करीत आहोत, आम्ही शांत बसणार नाही आहोत आम्हाला उपयोजना तात्काळ हव्यात असे सांगत यशवंतशेठ साबळे व भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने शिशु मंदिरच्या कार्यालयात जाऊन संचालक चुरी सर व मुख्याध्यापिका जैन्सी मॅडम यांना अनेक प्रलंबित व जीवघेण्या परिस्थिती वर जाब विचारला. व येत्या दोन दिवसात त्या प्रश्नांची उत्तरे किंवा उपायोजना समाधानकारक न वाटल्यास भारतीय जनता पक्षा तर्फे उपोषण आंदोलन घेतले जाईल अशी सूचना व इशारा दिला.

## वाशिम तालुक्यातील शेतकऱ्यांनी फळबाग लागवड योजनेचा लाभ घ्यावा. - अतुल जावळे.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**



शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य व बागायती शेतीला चालना देण्यासाठी कृषी विभागातर्फे मनेरगा अंतर्गत मागेल त्याला फळबाग लागवड योजना राबविण्यात येत आहेत. वाशिम तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन वाशिम तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे. यांनी केले आहे. या योजनेचा प्रमुख उद्देश म्हणजे शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि बागायती शेतीला प्रोत्साहन देणे. विशेषतः पाच एकर पेक्षा कमी क्षेत्र असलेल्या व जॉब कार्ड धारक शेतकऱ्यांसाठी या योजना फायदेशीर आहेत. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना. मागेल त्याला फळबाग लागवड योजनेत पात्र नसलेल्या किंवा मोठ्या क्षेत्रावर लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना आहे. यामध्ये 100% अनुदान तीन वर्षात दिले जाते. शेतकऱ्यांनी योग्य कागदपत्रासह लवकरात लवकर अर्ज सादर करून या योजनांचा लाभ घ्यावा. असे आवाहन वाशिम तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा.

**तालुका कृषी अधिकारी वाशिम. अतुल जावळे.**

## आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत. येणाऱ्या खेड्यासह आसेगावात देशी विदेशी गावठी दारू विक्री चां महापूर.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

मंगरूळपिर तालुक्यातील आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व खेड्यासह व आसेगाव ग्रामीण भागामध्ये मागील काही दिवसापासून येथे खुलेआम प्रतिबंधित गावठी व देशी दारूची विक्री होत असल्याची तक्रार सर्वच ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. आसेगाव सर्वच बाबतीत अव्वल आहे. तसेच दोन नंबरच्या धंद्यातही आवल आहे.युवक व्यसनाधीकडे वळत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. संभाव्य अनुचित घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी यावर नियंत्रण मिळवण्याची मागणी करण्यात आलेली आहे. मंगरूळपिर तालुक्यातील आसेगाव बाजारपेठ आहे. या ठिकाणी खेडेगावातील लोक विविध कामासाठी दर दिवशी येत असतात. त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलिसांसह सर्व



संबंधित यंत्रणांकडून योग्य उपाययोजना होणे आवश्यक आहे. परंतु तसे होत नाही नावालाच बंदी अवैध धंद्याची संधी अवैध धंद्याची कलाच न्यारी आसेगाव भागातही सुरू दुकानदारी त्यामध्ये पोलिसांची थेट भागीदारी. अशातला हा प्रकार दिसून येत आहे. अवैध धंद्याची खेळी अनेकांचे गेले बळी. तथापि या ठिकाणी अवैध दारू विक्री सह प्रतिबंधित गुटख्याची सुद्धा खुल्या विक्री होत असल्याची सामान्य जनतेत खमंग चर्चा आहे. या गावठी दारूवाल्यांना व गुटख्या वाल्यांना नेमका कोणाचा आशीर्वाद समजायचे आसेगाव पोलीस स्टेशनचा की वरिष्ठ अधिकाऱ्यांचा असा सवाल उपस्थित होत आहे. अवैध दारू विक्रीमुळे परिसरातील अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून. अनेकांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. ही बाब लक्षात घेत पोलीस प्रशासनासह उत्पादन शुल्क विभाग अन्न व औषध प्रशासनाकडून व आसेगाव ग्रामीण भागामध्ये ठिकठिकाणी कारवाईची मोहीम राबवणे आवश्यक झाले आहे.

एस पी अनुज तारे साहेब.आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत या गावांमध्ये मिळते देशी विदेशी गावठी दारू. कुंभी त सुध्दा ठीक ठिकाणी मिळते दारू.दाभडी आसेगाव विशेषत.. आसेगावात पोलीस स्टेशन असून सुद्धा गावठी देशी विदेशी दारू गुटखा खुलेआम सुरू.

# जासई विद्यालयात प्रवेशोत्सव समारंभ संपन्न




**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग,जासई ता. उरण जि.रायगड या विद्यालयात शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष कामगार नेते मा. सुरेश पाटील तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे चेअरमन मा.अरुण जगे तसेच व्हाईस चेअरमन डी.आर. ठाकूर हे उपस्थित होते.मान्यवरांचे स्वागत विद्यालयाच्या प्राचार्या मा.सौ म्हात्रे के.जी. मॅडम यांनी करून कार्यक्रमाचे प्रस्तावित केले. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते सर्व नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष,गोड चॉकलेट आणि पाठ्यपुस्तके देऊ केली. सकाळी शाळेच्या प्रवेशद्वारावर या येणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांचे वाजत-गाजत,ढोल ताशाच्या गजरात,लेझीम पथकाने स्वागत केले. या प्रवेशोत्सवाच्या दिनी दुपारी विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात गोड जेवण दिले गेले. या कार्यक्रमासाठी स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य श्री. नूरा शेख, गणेश पाटील, मधुकर पाटील, अमृत ठाकूर, गोपीनाथ ठाकूर,यशवंत घरत, प्रकाश म्हात्रे,आदित्य घरत, रघुनाथ ठाकूर, जी. सी. घरत, आणि पालक वर्ग तसेच उपमुख्याध्यापक श्री.कुटे सर, पर्यवेक्षिका सौ.मुकादम मॅडम,आणि सर्व सेवक वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. घरत पी.जे.व आभार प्रदर्शन श्री.ठाकरे एस.पी. यांनी केले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# कविता

कसा संपला ०६ पासून ६० वयापर्यंतचा हा प्रवास...
काही कळलंच नाही!

काय 'मिळवलं', काय 'कमावलं', काय 'गमावलं'...
काही कळलंच नाही!

संपलं 'बालपण', गेलं 'तारुण्य', केव्हा आलं 'ज्येष्ठत्व'...
काही कळलंच नाही!

काल 'मुलगा' होतो, केव्हा 'बाप' आणि नंतर 'सासरा' झालो...
काही कळलंच नाही!

केव्हा 'दादा' चा 'बाबा', नंतर 'बाबा' चा 'आबा' होऊन गेलो...
काही कळलंच नाही!

कोणी म्हणतं 'साठी बुद्धी नाठी', कोणी म्हणतं 'हाती आली काठी', काय खरं आहे...
काही कळलंच नाही!

पहिले 'आईबापाचं' चाललं, मग 'बायकोचं' चाललं, मग चाललं 'मुलांचं', मग चाललं 'सुनेचं', माझं कधी चाललं...
काही कळलंच नाही!

बायको म्हणते, आता तरी समजून घ्या. काय समजू? काय नको समजू? मग इतकी वर्ष समजुतीने कोणा बरोबर घेतली? का कुणास ठाऊक...
काही कळलंच नाही!

मन म्हणतंय 'तरुण' आहे मी, वय म्हणतंय 'वेडा' आहे मी. या साऱ्या धडपडीत केव्हा गुडघे झिजून गेले...
*काही कळलंच नाही.

झडून गेले 'केस', लोंबू लागले 'गाल', लागला 'चष्मा', केव्हा बदलला हा 'चेहरा'...
काही कळलंच नाही!

'काळ' बदलला, 'मी' बदललो बदलली 'मित्रमंडळीही.' किती निघून गेले, किती राहिले मित्र...
काही कळलंच नाही!

कालपर्यंत मौजमस्ती करीत होतो मित्रांसोबत, केव्हा 'सीनियर सिटिझन' चा शिक्का लागून गेला...
काही कळलंच नाही!

सून, जावई, नातू, पणतू, आनंदीआनंद झाला. केव्हा हासलं उदास हे जीवन...
काही कळलंच नाही.

भरभरून जगून घे जिवा, मग नको म्हणूस की, "मला काही कळलंच नाही!"

**- रानकवी (टोपणनाव)**

# साडे चारशे वर्षांपूर्वीच्या मोगलकालीन पूलावरून पुन्हा एकदा वाहतूक बंदी

## विद्यार्थी व नागरिकांचे होत आहेत हाल ; दोन ते तीन कि.मी. करावी लागणार पायपीट

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

नागोठणे-वरवठणे-रोहाकडील गावांना जोडणारा साधारण चारशे वर्षांपूर्वीचा आंबा नदीवरील मोगलकालीन ऐतिहासिक अरुंद पूलावरून वाहतुकीस बंदी असल्याचा बोर्ड पूलाच्या दोन्ही बाजूला महाराष्ट्र शासनाने साधारण नऊ वर्षांपूर्वी महाड येथील दुर्घटनेनंतर लावला होता.त्यानंतर रविवार 15 जून रोजी पुण्यातील इंद्रायणी नदीवरील दुर्घटनेनंतर पुन्हा एकदा महाराष्ट्र शासनाच्या महाड विभाग सार्वजनिक बांधकाम खात्याने पूलाच्या प्रवेशावर बंदीचा बोर्ड लावून पूल पूर्णपणे बंद केला असल्याने विद्यार्थी व नागरिकांचे हाल होत असून त्यांना आता दोन ते तीन की.मी. पायपीट करावी लागणार आहे. साधारण चारशे/साडेचारशे वर्षापूर्वी नागोठणे-वरवठणे तसेच तालुक्याचे ठिकाण रोहा व परिसरातील गावांना जोडण्यासाठी गूळ,चुना व अंडी यांचा वापर करून हा पूल बांधण्यात आला. त्यानंतर अनेक वर्षे या पूलाने लहान मोठ्या पुरासह महापुरही पाहिलेल्या या पूलावरून पूर्वी अवजड वाहनांची ये-जा होत होती. युती काळात अवजड वाहनास होती बंदी -- युती सरकारच्या काळात या पूलावरून एस.टी.,ट्रक,टेम्पो तसेच अवजड वाहनास बंदी घालण्यात आली व त्या अवजड वाहनांची वाहतूक नागोठणे-पोयनाड मार्गावरील नव्याने बांधण्यात आलेल्या पूलावरून करण्यात आली. तेव्हापासून या पूलावरून जीप,कार,रिक्षा,मोटरसायकल जाण्यासाठी जागा ठेऊन दोन्ही बाजूला कठडे बांधण्यात आले. त्यामुळे अवजड वाहतूक बंद






झाली. कालांतराने कठडे तुटल्यानंतर नागोठणे येथून रोहाकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग म्हणून या पूलावरून अवजड वाहतूक(खाजगी वाहने) पुर्ववत चालू झाली. महाड येथील पूल दुर्घटनेनंतर पुर्णपणे वाहतुकीस बंद - 2 ऑगस्ट 2016 रोजी महाड येथे झालेल्या दुर्घटनेनंतर शासनाने "सदरील पूलावरून सर्व प्रकारच्या वाहनास बंदी आहे. पर्यायी मार्गाचा वापर करा." असा बोर्ड लावण्यात आला. वाहतूक बंदीचा बोर्ड लावला असला तरी या पूलावरून कार,जीप,रिक्षा,मोटरसायकल यांची वाहतूक आजपर्यंत राजरोज चालू होता. इंद्रायणी नदीवरील पूल दुर्घटनेनंतर पुन्हा प्रवेश बंदी -- पुणे-कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पुल दुर्घटने नंतर सदरील पुलाच्या प्रवेशव्दारावर महाराष्ट्र शासन ,सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी सदरील पूल कमकुवत असल्यामुळे वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात येत असल्याचा दोन्ही बाजुला बोर्ड व बॅरीकेट्स लावून पूल बंद करण्यात आला आहे. विद्यार्थी व नागरिकांना दोन ते तीन की.मी. करावा लागणार प्रवास - सदरील पूलाचा वापर हे वरवठणे व परिसरातील आदिवासी वाड्यातील शाळा कॉलेज मध्ये जाणारे विद्यार्थी,मुंबई पुणे सारख्या शहरामध्ये नोकरी व काम धंद्यासाठी तसेच बाजाररहाट व दैनंदिन लागणाऱ्या प्रत्येक वस्तुसाठी नागोठणे येथे यावे लागते. चालत येता येणारा सदरील पूल बंद झाल्याने सर्वांना साधारण दोन ते तीन की.मी. चा वळसा घालून नागोठणे-पोयनाड मार्गावरील पूलावरून रोजचं यावे लागणार आहे. त्यासाठी वेळेचे नियोजन,रात्री अपरात्री वाहन व्यवस्था नसल्याने विद्यार्थी व नागरिकांचे हाल होणार असून पुलावर वाहनास बंदी असल्याचा बोर्ड लावल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त होत असले तरीही या पूलाचा ऐतिहासिक ठेवा जपण्यासाठी तसेच विद्यार्थी,नागरिकांना जवळचा पर्यायी मार्ग म्हणून विद्यार्थी,नागरिक व एकादी मोटरसायकल प्रवास करतील एवढ्या रुंदीची जागा ठेऊन दोन्ही बाजूला मजबूत कठडे संबंधित खात्याने बांधावेत अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नवीन पूल बांधण्याची मागणी - सदरील पूल हा 400 ते 450 वर्षापासुनचा पुल आहे. यावरील 1995 साली युती सरकारने अवजड वाहतूक बंद केली आहेत. तेव्हा पासून अवजड वाहतूक बंद असली तरी यावरच न थांबता या ठिकाणी नवीन पूल होणे गरजेचे आहे.याबाबत मी खासदार,आमदार यांच्याकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला आहे परंतु याचे साधे उत्तरही आले नाही.हा पुल चुना व दगडाने बांधलेला होता परंतु आता त्याची दगडे निघून जात असून पूल पोकळ झाल्याचे निदर्शनात येत आहे. आजपर्यंत तेथे वाढलेली झाडे झुडपे यांची साफसफाई संबंधित खात्याने केलेली नसून ती साफ सफाई मी नेहमी करीत असलो तरीही आज ना उद्या हा पूल पडणार असून या ठिकाणी शासनाने लक्ष दिले पाहिजे जेणे करून जीवितहानी होणार नाही.तसेच सदर पुलाच्या शेजारी नविन पुल बांधकाम करण्यासाठी मी अनेक वर्षे प्रयत्न करीत असल्याचे वरवठणे येथील ग्रामस्थ तथा भाजपा माजी उपजिल्हाध्यक्ष किशोर म्हात्रे यांनी सांगितले.

## स्वाधार योजनेच्या ऑनलाईन त्रृटीची पूर्तता करण्यासाठी मुदतवाढ द्या,अन्यथा आंदोलन तीव्र आंदोलन छेडणार..... संतोष अंभोरे

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजी नगर**
**जगन्नाथ रासवे**

दि.१६ जुन रोजी विद्यार्थी नेते संतोष अंभोरे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना २०२४/२५ या शैक्षणिक वर्षातील त्रुटी पुर्तता करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी समाज कल्याण आयुक्त पुणे महाराष्ट्र राज्य यांना समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त छत्रपती संभाजी नगर यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले असुन त्रृटी पुर्तता न केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या महाराष्ट्र भरात जवळपास पाच हजारांहून अधिक आहे. हे सर्व मागासवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी ग्रामीण भागातील असून शहरात राहुन आपले शिक्षण पुर्ण करत आहेत. स्वाधार विभाग, समाजकल्याण कार्यालय, छत्रपती संभाजी नगर यांनी सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे फॉर्म त्रृटी भरण्यासाठी वापस पाठवले होते परंतु त्यांनी एकाही विद्यार्थ्यांना तुमचे फॉर्म परत पाठवले आहेत असे फोन करून सांगितले नाही. त्यामुळेच या अर्जाच्या त्रृटीची पूर्तता करणे विद्यार्थ्यांकडून राहून गेले आहे. व्यावसायिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे मार्कशीट वेळेवर न मिळाल्यामुळे त्यांना ती मार्कशीट अपलोड करता आली नाही त्यामुळेच




ही त्रृटी राहिली असल्याचे मत काही विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे.त्रटीची पुर्तता करण्यासाठी मुदतवाढ मिळाली नाही तर याचा फटका या गरजु, शोषित वंचित विद्यार्थ्यांना बसणार आहे जर मुदवाढ मिळाली नाही तर मोठ्या ताकदीने याविरोधात आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे विद्यार्थी नेते संतोष अंभोरे यांनी दिला आहे .यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# चार किलो गांजा अमली पदार्थासह एका आरोपीला अटक.कारंजा शहर पोलिसांची मोठी कारवाई.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

सध्या लहान लहान शहरांमध्ये सुद्धा अमली पदार्थाच्या तस्करीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. शहरात नशेची अमली सहज उपलब्ध होत असल्यामुळे तरुण वर्गामध्ये नसेचे प्रमाण वाढत असून तरुण वर्ग आपले भविष्य विसरून वेगळ्याच दिशेला जात असल्याचे दिसत आहे. अशा नशा करणाऱ्या मुलांच्या आई-वडिलांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे असे अवैध धंदे करणाऱ्या वर नखेल कसणे आवश्यक झाले आहे. अशाच मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सापळा रचून कारंजा शहर पोलिसांनी चार किलो गांजा अमली पदार्थ पकडून आरोपी रियाज उल्ला खान उर्फ राजू समीर उल्ला खान वय 31वर्ष. रा मंगळवारा कारंजा.याला अटक करण्यात आली आहे. सविस्तर माहिती अशी की. पोलीस स्टेशन कारंजा शहर येथे दि. 14.6.2025.रोजी. सर तर्फे फिर्यादी सपोनी. प्रशांत सुबनावळ पो स्टे कारंजा शहर यांनी रिपोर्ट दिला की दि.13.6.2025.रोजी पोलीस स्टेशन कारंजा शहर येथे हजर असताना पो स्टे. कारंजा शहर चे पोलीस आमलदार पोहवा. मयुरेश तिवारी यांना खास गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की कारंजा शहरातील बस स्टँड टी पॉइंट परिसरामध्ये नामे. रियाज उल्ला खान हा एका कळ्या रंगाच्या बॅग मध्ये गांजा सदृश्य अमली पदार्थ घेऊन येणार आहे. वरून सदर माहिती



वरिष्ठांना देऊन त्यांच्या आदेशाने 13. 6. 2025. रोजी रात्री.11:35.वा. दरम्यान बस स्थानक टी पॉईंट कारंजा येथे पोलीस अधिकारी अमलदार व पंच असे मिळून मिळालेल्या माहितीप्रमाणे सापळा रचून इसम नामे रियाज उल्ला खान उर्फ राजू समीर उल्ला खान.वय 31.वर्ष. रां मंगळ वारा. कारंजा लाड जी वाशिम. यास मोक्यावरच पंचायत समक्ष पकडून ताब्यात घेऊन कायदेशीर कारवाई करून त्याची अंगझडती व त्याच्या ताब्यातील कळ्या रंगाची बॅग ची झडती घेतली असता त्यामध्ये गांजा सदृश्य अमली पदार्थाचे 14 लहान मोठे खाकी रंगाचे चिकट टेप ने पॅक केलेले पाकिटे मिळून आली. फॉरेन्सिक टीम वाशिम यांच्या मदतीने सदर पाकिटे फोडून त्यामध्ये गांजा सदृश्य अमली पदार्थाचे वजन केले असता नेट 3.किलो557.7 ग्रॅम की अ.52.500. रुपयाचा माल मिळून आला. वरून सदरचा माल दोन पंचा समक्ष जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करून ताब्यात घेतला. सदरची कार्यवाही मां पोलीस अधीक्षक. अनुज तारे. वाशिम अप्पर पोलीस अधीक्षक. लता फड. मॅडम उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी. रामकृष्ण महल्ले पोलीस निरीक्षक दिनेश चंद्र शुक्ला. यांच्या मार्गदर्शनात सपोनी. प्रशांत सुबनावळ. पोहे का गणेश जाधव मयुरेश तिवारी. पोहवा. उमेश कुमार बिबेकर अनिस निन्सुरवाले मोहम्मद परसूवाले पो कॉ. नितीन पाटील अमित भगत पो स्टे. कारंजा शहर तसेच स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथील पोलीस अमलदार पोहवा गजानन झगरे. पोहवा गजानन अवघडे.पो.ना. गजानन गोटे. चापो का. सुनील तायडे यांनी केली असून पुढील तपास सपोनी. जयदीप पवार.पो स्टे. कारंजा शहर हे करीत आहे.

# तुळशीदास तांडेल यांनी सानेगुरुजींचे विचार कथामालेव्दारे खेड्यापाड्यात पोहचविले

दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर/मोहन कदम)

साने गुरुजी कथामालेतील विचार गेली चार दशके पालघर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतील खेड्यातील शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम समाजसेवक तुळशीदास तांडेल यांनी निस्पृहपणे करून विक्रमगड सारख्या आदिवासी भागातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक,सामाजिक उपक्रमे ते आजही राबवित आहेत,त्यासाठी प्रसिध्दिच्या मागे न लागता करीत असलेली कामे ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन कोकण मराठी साहित्य परिषद पालघर जिल्हाध्यक्ष तथा आजचा तटरक्षकचे संपादक प्रवीण ना.दवणे यांनी केले. साने गुरुजी कथामाला चळवळीचे निस्पृह कार्यकर्ते तुळशीदास तांडेल यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त कांदिवली येथील साई परीवार सेवाभावी ट्रस्ट, सानेगुरुजी कथामाला मुरबे व विकास केंद्र मुरबे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ जून रोजी पालघर तालुक्यातील मुरबे येथील श्री राम मंदिर येथे गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.त्या प्रसंगी व्यासपीठावर सत्कारमूर्ती तुळशीदास तांडेल, संपादक प्रवीण ना.दवणे, पालघर तालुका मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष प्रकाश वैद्य,साई परीवार सेवाभावी ट्रस्टच्या पदाधिकारी सौ.मनिषा रासम,सदस्य अनिल वडके, महेश वर्मा,समीर भिकाजी सागवेकर, यासिन कादर खान आदिवासी सेवा मंडळ मुंबई,चे सेक्रेटरी यशवंत वातास सर आदी मान्यवर उपस्थित होते. तांडेल यांच्यावर असलेल्या प्रेमापोटी अनेक चाहत्यांनी शाल,श्रीफळ, भेटवस्तू




देऊन शुभेच्छा दिल्या.त्यांच्या सेवाभावी योगदानाबाबत अखिल भारतीय सानेगुरुजी कथामालाचे कार्याध्यक्ष बी.एस.पाटील, प्रकाश वैद्य, समाजसेवक वसंत तांडेल, साहित्यिका अनुपमा जाधव, कुंभार सर, साहित्यिका आशाताई दहाड,ठाणे येथील के.डी.पाटील,वृशाली चुरी,समाजसेविका विद्या संखे आदि मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. गौरव सोहळ्याच्या प्रारंभा आधी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यदलातील सर सेनापतीपैकी असलेले सरसेनापती दाजी पासलकर यांचे वंशज वक्ते संजय पासलकर यांनी उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी समोर दैववादापेक्षा स्वकर्तृत्वाने वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून स्वतःची प्रगती,समाज हित व राष्ट्रहित जपण्यासाठी उत्कृष्ट प्रबोधन केले. गौरव सोहळ्याच्या प्रारंभी सानेगुरुजीच्या प्रतिमेचे मान्यवरांनी पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.विद्यार्थिनींनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे हे गीत सादर करून स्वागत करण्यात आले.सत्काराला उत्तर देताना तुळशीदास तांडेल यांनी मला दिलेल्या शुभेच्छेमुळे यापुढे कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळाली असून उर्वरित आयुष्य सेवेमध्ये व्यतीत करण्याचे सांगितले. या प्रसंगी साई परीवार सेवाभावी ट्रस्टचे संतोष जाधव,अ.भा.मांगेला समाज परिषदेचे माजी अध्यक्ष अशोक तांडेल,ठाणे जिल्हा मच्छीमार मध्यवर्ती सहकारी संस्थेचे माजी अध्यक्ष जयकुमार भाय,दीपक अक्रे,मुरबे पंचक्रोशीतील विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हंसा पांचाळ यांनी सत्कार सोहळ्याला साजेसे असे केले.
मुरबे पंचक्रोशीतील विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हंसा पांचाळ यांनी सत्कार सोहळ्याला साजेसे असे केले.

# पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी वृक्ष लागवडीची गरज- सुभाषराव चव्हाण

## चिपळूण नागरी व वाशिष्ठी डेअरी, जिल्हा निबंधक सहकारी संस्थेतर्फे पिंपळीखुर्द येथे वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी):--**

तुम्हाला मायेची ऊब हवी असेल तर मग आईच्या नावे प्रत्येक भारतीयाने एक वृक्ष लावावा आणि त्याला जगवावे, कारण पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी वृक्ष लागवडीची गरज आहे, असे प्रतिपादन चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांनी पिंपळीखुर्द येथील श्री ग्रामदैवत केदार सुकाई मंदिर प्रवेशद्वारासमोर ५७ प्रकारच्या आयुर्वेदिक वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना केले. चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था, वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि., वाशिष्ठी पंचक्रोशी सहकारी दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या. पिंपळी, जिल्हा निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी, चिपळूण तालुका स्वयंरोजगार सेवा उद्योग सहकारी संस्था मर्यादित, चिपळूण. या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ' एक पेड मेरे माँ के नाम' या मोहिमेअंतर्गत पिंपळी खुर्द येथील श्री ग्रामदैवत केदार सुकाई मंदिर प्रवेशद्वारासमोर रविवारी ५७ प्रकारचे आयुर्वेदिक वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये कदंब, अर्जुन , वड, पिंपळ, कडुलिंब तसेच आंबा, काजू, जांभुळ, चिंच, आवळा या झाडांचा समावेश आहे.
यावेळी या वृक्षारोपण उपक्रमाविषयी आपली भूमिका मांडताना चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांनी तुम्हाला मायेची हवी असेल तर मग आईच्या नावे प्रत्येक भारतीयांनी एक वृक्ष लावावा आणि त्याला जगवावे.







कारण पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी केंद्र शासनाने १४० कोटी जनतेच्या खांद्यावर १४० कोटी वृक्ष लागवडीची जबाबदारी सोपवली आहे. 'एक पेड मेरे माँ के नाम' ही संकल्पना राबवण्याचा निर्धार सोडला आहे. आईच्या नावाने लावलेले झाड भविष्यात मुलांना नक्कीच सुखाची सावली देईल, यात दुमत नाही असे सांगितले.
यावेळी वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव, चिपळूण नागरीचे व्हाईस चेअरमन अशोक साबळे, संचालिका सौ. स्मिता चव्हाण, जिल्हा निबंधक डॉ. सोपान शिंदे, सहाय्यक निबंधक सौ. प्रियांका माने, चिपळूण नागरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा वाशिष्ठी डेअरीच्या मुख्य प्रवर्तक सौ. स्वप्ना यादव, पिंपळीखुर्द सरपंच अंजली जांबुर्गे, सदस्य रवींद्र सागवेकर, दादा देवरुखकर, पोलिस पाटील दीपाली भाबल, हरिश्चंद्र चव्हाण, सदानंद कडव, चिपळूण नागरीचे संचालक रवींद्र भोसले, गुलाब सुर्वे, मनोहर मोहिते, राजेंद्र पटवर्धन, संचालिका ॲड. नयन पवार, नीलिमा जगताप, सौ. तृप्ती यादव, कु. स्वामिनी यादव, जनार्दन पवार, डॉ. सुनील सावंत, वासुदेव मेस्त्री, मुन्ना दळी,रमण डांगे, वाशिष्ठी डेअरीचे मॅनेजर प्रदीप मगदूम, लक्ष्मण खरात, विजय वाजे माजी नगरसेवक राजू देवळेकर, राहुल लोटेकर, तर चिपळूण नागरीचे प्रशांत वाजे, महेश खेतले, अविनाश गुढेकर, संदीप पाटील, तसेच सौ. अंजली कदम, सौ. मनिषा पवार, पद्मा ओली आदी उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी चिपळूण नागरीच्या कार्यकारी अधिकारी तथा वाशिष्ठी डेअरीच्या मुख्य प्रवर्तक सौ. स्वप्ना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली चिपळूण नागरीचे अन्य अधिकारी तसेच वाशिष्ठी डेअरीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाने मेहनत केली.

## श्री योगानंद विद्यालय परतुर मध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय**
**संपादक प्राचार्य जगन्नाथ रासवे**

श्री योगानंद विद्यालयात काल नविन प्रवेश घेणारे व शाळेतील आधीचे सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. ढोल व लेझीम पथकाच्या गजरात नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमासाठी संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, शालेय पुस्तके वर्ग पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले तसेच या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे संस्थापक आदरणीय श्री मनोहरराव पेडगांवकर काका अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. व विद्यालयाचे प्राचार्य श्री मोगल सर, पर्यवेक्षक श्री थोरवे ,पालक, प्रतिनिधी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होते.



# कोकण सुपुत्र केतन भोज,शांताराम गुडेकर, दिपक कारकर,निलेश कोकमकर" आदर्श पत्रकार पुरस्कार -२०२५ ने सन्मानित

## दै.अग्रलेखच्या चौथ्या वर्धापनदिनी कर्तृत्ववान व्यक्तीमत्वांचा सन्मान,पत्रकार,कलावंतांच्या पाठीवर शाबासकीची थाप

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुरु झालेल्या आणि अल्पावधीतच ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि नाशिक जिल्ह्यात पोहोचलेल्या दै. अग्रलेखचा चौथा वर्धापनदिन रविवारी (दि.१५) कल्याणमधील के.सी. गांधी ऑडिटोरियममध्ये मोठ्या जल्लोषात साजरा झाला. विविध क्षेत्रांत कर्तृत्व गाजवणाऱ्या मान्यवरांना 'दै. अग्रलेख सन्मान २०२५' हा मानाचा पुरस्कार देवून व पत्रकार, नाट्य कलावंतांना सन्मानित करुन दैनिक अग्रलेखने चौथ्या वर्धापनदिनी अनोखा पायंडा पाडला. मुंबईत नामांकित पत्रकारांच्या मुशीत तयार झालेल्या उमेश मारुती भेरे यांनी चार वर्षांपूर्वी शहापुरमध्ये दै. अग्रलेख हे दैनिक वृत्तपत्र सुरु केले. अभ्यासपूर्ण व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या दखलपात्र बातम्या, अग्रलेख, विविध विषयांचा वेध घेणारी सदरे, वात्रटिका यांमुळे अल्पावधीतच लोकप्रिय बनलेल्या दैनिक अग्रलेखने ४ वर्षांचा यशस्वी पल्ला गाठला.या चौथ्या वर्धापनदिन कार्यक्रम जिजाऊ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश भगवान सांबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात रुग्णसेवक अजित जाधव, मुंबई म्युनिसिपल को. ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक भानुदास भोईर,अभिनेते सुभाष शिंदे,पत्रकार सुबोध रणशेवरे,वैद्यकीय अधिकारी डॉ. तरुलता धानके, समाजसेविका डॉ. पद्मिनी कृष्णा, साहित्यिक संतोष जाधव, लेखक, अभिनेता दिपक खांडेकर यांना मान्यवरांच्या हस्ते 'दै. अग्रलेख सन्मान २०२५' हा मानाचा पुरस्कार देवून गौरवण्यात आले. दैनिक अग्रलेखच्या वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या पत्रकारांचा आदर्श पत्रकार पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.या पुरस्कार वितरण समारंभात कोकणचे सुपुत्र समाजसेवक आरटीआय कार्यकर्ता केतन भोज, शांताराम गुडेकर, दिपक कारकर, निलेश कोकमकर यांना "आदर्श पत्रकार पुरस्कार -२०२५ " देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामधील कोचरी गावातील सुपुत्र कु. केतन भोज यांचा हा सातवा पुरस्कार असून ते आरटीआय कार्यकर्ता आहेत. शिवाय कोकणच्या समस्यांवर लेखन करून त्यांचा पाठपुरावा सातत्याने ते करत आहेत.महाराष्ट्र हरित सेना,वन विभाग महाराष्ट्र शासनचे ते सदस्य आहेत.कोकणातील अनेक समस्या वर्तमान पत्रात मांडून त्यांना मार्गी लावण्यात केतन भोज अग्रेसर आहेत. त्यांना मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या सहीचे सोशल मिडिया महामित्र हे सन्मानपत्रही प्राप्त झालेले आहे. शिवाय ते विविध संस्था,पत्रकार संघटना, वृत्तपत्र लेखक संघ,मंडळ यांचे पदाधिकारी असून हातात घेतलेलं प्रत्येक काम पूर्ण करण्यात ते यशस्वी झालेले आहेत.आजवर अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील देवरुख शहरापासून जवळच असलेल्या सह्याद्रीचा प्रतिकैलास श्रीक्षेत्र मार्लेश्वर परिसरातील आंगवली-रेवाळेवाडीचे सुपुत्र विक्रोळी पश्चिम पार्क साईट येथील रहिवासी दै. अग्रलेखचे मुंबई/कोकण विभागीय संपादक, वृत्तपत्रलेखक शांताराम लक्ष्मण गुडेकर ( EX.S.E.O)यांची जॉय सामाजिक संस्था मुंबई(रजि.) तर्फे "आदर्श पत्रकार पुरस्कार -२०२५ प्राप्त झाला असून त्यांना दै. अग्रलेख तर्फे"आदर्श पत्रकार पुरस्कार-२०२५ प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले. शांताराम गुडेकर यांना महाराष्ट्र शासनाने "विशेष कार्यकारी अधिकारी" म्हणून २०१२ ते २०१७ या काळावधीसाठी नियुक्त केले होते.त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर फॅलोशिप पुरस्कार -दिल्ली प्राप्त झालेला आहे.ते महाराष्ट्र शासनाच्या नागरी संरक्षण दल-एन विभाग-क्षेत्र-३ मध्ये स्वयंसेवक म्हणून कार्यरत होते.शिवाय महाराष्ट्र शासन अनुदानित नशाबंदी मंडळ- महाराष्ट्र राज्य या मंडळतर्फे नशाबंदी चे काम करतात.कोकण विभाग पत्रकार संघ मुंबई जिल्हा सचिव म्हणून ते काम पाहिले असून त्यांना नगर मित्र,आदर्श समाजसेवक ,समाजरत्न , दक्ष नागरिक ,कोकण भूषण ,वृत्तदिप पुरस्कार ,महापौर गौरवपत्र तसेच सोनी टि.व्ही वरील सी.आय.डी मालीकेला वर्धापनदिनानिमि आयोजित कार्यक्रमात शांताराम गुडेकर यांना "स्थानिक हिरो" सी.आय.डी मेडल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे. शांताराम गुडेकर महाराष्ट्र हरित सेना, वन विभाग, महाराष्ट्र शासन चे सदस्य, माझी वसुंधरा, महाराष्ट्र शासन चे सदस्य आहेत. शिवाय माहिती अधिकार, पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण सेना चे मुंबई जिल्हा प्रसिद्धी प्रमुख आहेत.अखिल भारतीय पत्रकार हक्क संसद समिती चे मुंबई उपनगर सचिव आहेत. पत्रकार दिपक कारकर उत्तम सूत्रसंचालक असून कोकणातील शक्ती-तुरा, नमन, नाटक आदी लोककलेना मुंबई रंग मंचावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात अग्रेसर आहेत. ते श्री पानबुडी देवी कलामंच आणि सहकारी यांच्या माध्यमातून विविध कार्यक्रम आयोजित करत असतात.कोकणातील सर्व क्षेत्रातील दुर्लक्षित असलेल्या कलाकारांना पुढे आणण्यात दिपक कारकर पुढे असतात. पत्रकार म्हणून कोकण विभागातील अनेक समस्या, जनजागृती करणारे लेखन ते सतत करत असतात. ते एक उत्तम कलाकार ही आहेत. सर्वाना सोबत घेऊन काम करणे ते जास्त पसंद करतात. आजवर अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले असून ते विविध मंडळ, ग्राम, मुंबई विभागातील संस्था, समाज मंडळ वर पदाधिकारी म्हणून उत्तम काम करत आहेत. निलेश कोकमकर पत्रकार असून रक्तदानचे महत्व पटवत स्वतः रक्तदान करतात.शिवाय जनजागृती करत रक्तदान विषयी प्रचार आणि प्रसार करत आहेत. रक्तदान हे महानदान मानले जातेच त्याच मूळ कारण आपलं रक्तदान म्हणजेच इतरांना जीवनदान,कधी कधी जिथं रक्ताची नाती सुद्धा तयार होत नाहीत तिथं अनेक रक्तदाते एखाद्याला जीवनदान देण्याकरता तत्पर असतात हे म्हणावं लागेल.वर्षभर अनेक ब्लड कॅम्प तसेच नवनवीन रक्तदात्यांना प्रेरित करुन रक्तदान करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल विविध संस्था, मंडळ, ब्लड बँक तर्फे निलेश कोकमकर यांना सन्मानित केले आहे.ते विविध मंडळ, ग्राम, समाज मंडळ, युवा मंडळ मध्ये कार्यरत असून त्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहेत. ग्रामीण कला मंच या नाट्यक्षेत्रातील नामवंत संस्थेच्या व्यासपीठावर विविध नाटके सादर करणाऱ्या कलावंतांना सन्मानपत्र देवून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचा स्तुत्य उपक्रम याप्रसंगी संपादक उमेश भेरे व कार्यकारी संपादक मैथिली भेरे यांनी राबवला. दैनिक अग्रलेखने शहापुरमधील सामाजिक प्रश्नांवर लोकजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या खुल्या निबंध स्पर्धेचा पारितोषिक प्रदान सोहळाही यावेळी संपन्न झाला. उपस्थित मान्यवरांनी संपादक उमेश भेरे यांच्या व दै. अग्रलेखच्या यशस्वी वाटचालीबद्दल अभिनंदन करत भेरे यांच्या अग्रलेखांचे व वात्रटिकांचे विशेष कौतुक केले.

याप्रसंगी उत्तर भारतीय एज्युकेशन ऍण्ड रिसर्च इन्स्टिटयूटचे अध्यक्ष डॉ. विजय पंडित, निर्माता-दिग्दर्शक राकेश राऊत, ह. भ. प. कैलास महाराज निचिते, कोकण कुणबी महोत्सव समितीचे अध्यक्ष रविंद्र चंदे, शहापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विनायक सापळे, क्रूगर व्हेंटीलेशनचे जनरल मॅनेजर संपत शेंडगे, उद्योजक अशोक सांगळे, पालघर जिल्हा परिषदेचे आरोग्य व बांधकाम समिती सभापती संदेश ढोणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. केतन भोज, शांताराम गुडेकर, दिपक कारकर, निलेश कोकमकर यांना "आदर्श पत्रकार पुरस्कार -२०२५ प्राप्त झाल्याबद्दल अनेकांनी अभिनंदनासह शुभेच्छा दिल्या आहेत.या सोहळ्याचे प्रास्ताविक संपादक उमेश भेरे यांनी तर सूत्रसंचालन नितीन गाडेकर व संतोष दवणे यांनी केले.



## झाडे लावणे ही काळाची गरज

**दैनिक युवक आधार-**
युवा क्रांती ,पोलिस मित्र,वसुधा फाऊंडेशन तसेच काव्ययोग काव्य संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झाडे लावा , झाडे जगवा या उपक्रमातून झाडे लावण्याचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी संस्थेच्या वतीने तब्बल 30/40 सावली देणारे विविध झाडे लावण्यात आली.यावेळी डॉ.राजेंद्र हेंद्रे राष्ट्रीय संघटक युवा क्रांती, सौ.वसुधा नाईक वसुधा फाऊंडेशन अध्यक्षा, मा.योगेश हरणे काव्ययोग काव्य संस्था अध्यक्ष,शितल नाईक ,रवी डिंबळे, सौ.वंदना पाटील हे सदस्य उपस्थित होते. पिंपळे गुरव - नक्षत्र वन विभागात हा उपक्रम पार पडला.या उपक्रमातून वसुधा नाईक यांनी असा संदेश दिला ,झाडे ही काळाची गरज आहे. पुण्या सारख्या शहरात वाढत्या लोकसंख्यामुळे झाडे तोडण्यात येतात. त्यामुळे आपल्याला शुद्ध हवा मिळत नाही. शुध्द हवा मिळावी. तसेच निसर्गाचे आपण मित्र व्हावे असा संदेश दिला. पर्यावरणाचे रक्षण करावे. संत तुकाराम यांच्या अभंगानुसार वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे,वृक्षवल्ली आम्हा सोयरी! खरं तर झाडे ही आपले मित्र, नातेवाईक असतात.त्यांची जोपासना करून वेगळाच आनंद निर्माण होतो.आणि विशेष म्हणजे पावसाळ्यात झाडे लावली की लवकर वाढ होते.त्यामुळे हा उपक्रम हाती घेऊन एक वेगळा सामाजिक संदेश लोकांपर्यंत पोहोचवला.

**झाडे लावा झाडे जगवा**
**पर्यावरणाला हातभार लावा...**
**वसुधा वैभव नाईक, पुणे**




## महाराष्ट्र राज्यातील रुग्णवाहिका चालक-मालक यांच्यासाठी शासन दरबारी महाशक्ती अँब्युलन्स असोसिएशनने मांडली मागणी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर**
राज्यातील रुग्णवाहिका चालक व मालक यांच्या समस्या सोडविण्यासाठी महाशक्ती अँब्युलन्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांनी शासनाकडे विविध मागण्या सादर केल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील अम्बुलन्स चालक मालक यांच्यावतीने महाशक्ती असोसिएशनचे विविध जिल्ह्यातील पदाधिकारी यांनी एकत्र येऊन महाराष्ट्र शासनाचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे खाजगी सचिव अनिकेत मानोरकर यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे परिवहन विभागाचे राज्यमंत्री माधुरी ताई मिसाळ यांच्याकडेही त्या स्वरूपाचे पत्र देण्यात आली आहे. आणि माधुरीताई यांनी आपण नक्कीच विचार करून इतर माहिती घेऊन कारवाई करण्याचे आदेश देऊन आपल्या बाकी खाली दिल्याप्रमाणे इतर मागण्यांचा विचारही करण्याची आश्वासन दिले. या निवेदनात रुग्णवाहिका चालक व मालक यांच्यासमोर निर्माण झालेल्या आर्थिक, सामाजिक व प्रशासकीय अडचणींचा आढावा घेण्यात आला आहे. मागण्यांमध्ये मुख्यतः खालील बाबींचा समावेश आहे: रुग्णवाहिका सेवेसाठी दर निश्चित करावेत. या क्षेत्रासाठी महामंडळ स्थापन करून असोसिएशनच्या प्रतिनिधीला सदस्यत्व द्यावे. रुग्णवाहिका सेवा खासगी सेवा नसून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा भाग असल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळावा.





रुग्णवाहिकांवरील इंधन, टोल, विमा, पाणी पुरवठा यावर सवलत द्यावी. वाहनचालकांसाठी आरोग्य व अपघात विमा, सेवानिवृत्ती योजना लागू कराव्यात. अपघातग्रस्त वा मृत्यूमुखी पडलेल्या चालक कुटुंबीयांना तत्काळ शासकीय मदत मिळावी. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शरद कात्रजकर, सचिव अर्जुन चव्हाण, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष मुकुंद कांबळे,मुंबई संपर्कप्रमुख संतोष मोहिते यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या काही वर्षांत रुग्णवाहिका चालविणाऱ्यांना कोणतीही सवलत मिळालेली नाही. शासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन त्वरित निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

याची दुसरी प्रत परिवहन विभागाचे राज्यमंत्री माधुरी ताई मिसाळ यांच्याकडे सुद्धा देण्यात आली आहे. हो

## सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत

### प्रबोधनकार भावेश कोटांगले राज्यस्तरीय कलारत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**
भंडारा-सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस, विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा संपादक, जनता टाईम /जटा टीव्ही प्रतिनिधी संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 9 जून 2025 ला शांतीवन बुद्ध विहार येथे प्रबोधनकार भावेश कोटांगले एकोडी साकोली यांना सन्मानचिन्ह, सन्मान प्रमाणपत्र, मानाचा फेटा व पुष्पगुच्छ देऊन माजी खासदार तथा अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. खुशाल बोपचे, दैनिक माझा मराठवाड्याचे मुख्य संपादक दशरथ सुरडकर, जनता टाईम/ जटा टीवी चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे नागपूर ,पत्रकार संजीव भांबोरे, संविधान संघर्ष समितीचे भंडारा जिल्हाध्यक्ष रोशन जांभुळकर, शांतीवन बुद्ध विहाराचे संचालक जीवन बोधी बौद्ध, दैनिक माझा मराठवाडा कार्यकारी संपादक संजय दांडगे ,दैनिक माझा मराठवाडा विभागीय संपादक गोकुळ सिंग राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. वाढदिवस हे नाममात्र होते .परंतु समाजातील विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा सन्मान व्हावा, त्यांच्या कलागुणांचा गौरव व्हावा या उदात्त हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते हे विशेष.



# तुळशीदास तांडेल यांनी सानेगुरुजींचे विचार कथामालेव्दारे खेड्यापाड्यात पोहचविले

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर/मोहन कदम)**

साने गुरुजी कथामालेतील विचार गेली चार दशके पालघर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतील खेड्यातील शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम समाजसेवक तुळशीदास तांडेल यांनी निस्पृहपणे करून विक्रमगड सारख्या आदिवासी भागातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक,सामाजिक उपक्रमे ते आजही राबवित आहेत,त्यासाठी प्रसिध्दिच्या मागे न लागता करीत असलेली कामे ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन कोकण मराठी साहित्य परिषद पालघर जिल्हाध्यक्ष तथा आजचा तटरक्षकचे संपादक प्रवीण ना.दवणे यांनी केले.



साने गुरुजी कथामाला चळवळीचे निस्पृह कार्यकर्ते तुळशीदास तांडेल यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त कांदिवली येथील साई परीवार सेवाभावी ट्रस्ट, सानेगुरुजी कथामाला मुरबे व विकास केंद्र मुरबे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ जून रोजी पालघर तालुक्यातील मुरबे येथील श्री राम मंदिर येथे गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.त्या प्रसंगी व्यासपीठावर सत्कारमूर्ती तुळशीदास तांडेल, संपादक प्रवीण ना.दवणे, पालघर तालुका मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष प्रकाश वैद्य,साई परीवार सेवाभावी ट्रस्टच्या पदाधिकारी सौ.मनिषा रासम,सदस्य अनिल वडके, महेश वर्मा,समीर भिकाजी सागवेकर, यासिन कादर खान आदिवासी सेवा मंडळ मुंबई,चे सेक्रेटरी यशवंत वातास सर आदी मान्यवर उपस्थित होते.

तांडेल यांच्यावर असलेल्या प्रेमापोटी अनेक चाहत्यांनी शाल,श्रीफळ, भेटवस्तू देऊन शुभेच्छा दिल्या.त्यांच्या सेवाभावी योगदानाबाबत अखिल भारतीय सानेगुरुजी कथामालाचे कार्याध्यक्ष बी.एस.पाटील, प्रकाश वैद्य, समाजसेवक वसंत तांडेल, साहित्यिका अनुपमा जाधव, कुंभार सर, साहित्यिका आशाताई दहाड,ठाणे येथील के.डी.पाटील,वृशाली चुरी,समाजसेविका विद्या संखे आदि मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

गौरव सोहळ्याच्या प्रारंभा आधी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यदलातील सर सेनापतीपैकी असलेले सरसेनापती दाजी पासलकर यांचे वंशज वक्ते संजय पासलकर यांनी उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी समोर दैववादापेक्षा स्वकर्तृत्वाने वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून स्वतःची प्रगती,समाज हित व राष्ट्रहित जपण्यासाठी उत्कृष्ट प्रबोधन केले. गौरव सोहळ्याच्या प्रारंभी सानेगुरुजीच्या प्रतिमेचे मान्यवरांनी पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.विद्यार्थिनींनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे हे गीत सादर करून स्वागत करण्यात आले.सत्काराला उत्तर देताना तुळशीदास तांडेल यांनी मला दिलेल्या शुभेच्छेमुळे यापुढे कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळाली असून उर्वरित आयुष्य सेवेमध्ये व्यतीत करण्याचे सांगितले. या प्रसंगी साई परीवार सेवाभावी ट्रस्टचे संतोष जाधव,अ.भा.मांगेला समाज परिषदेचे माजी अध्यक्ष अशोक तांडेल,ठाणे जिल्हा मच्छीमार मध्यवर्ती सहकारी संस्थेचे माजी अध्यक्ष जयकुमार भाय,दीपक अक्रे,मुरबे पंचक्रोशीतील विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हंसा पांचाळ यांनी सत्कार सोहळ्याला साजेसे असे केले. मुरबे पंचक्रोशीतील विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हंसा पांचाळ यांनी सत्कार सोहळ्याला साजेसे असे केले.

## लोनबेहळ येथे तरुणाचा भीषण अपघात

**दैनिक युवक आधार**
**आर्णी : देवा पवार**
राष्ट्रीय महार्गावर भीषण अपघाताचे सत्र सुरु आहे त्यामागचे कारण असे कि, लोनबेहळ येथे असलेला उड्डाणपूल च महार्गावर सेर्विस रोड म्हणून फक्त कच्चा मार्ग अपूर्ण असलेल्या रस्त्यामुळे अपघात निदर्शनास आले, संबंधित रस्त्याकरिता वारंवार पाठपुरावा करूनही काही प्रतिसाद मिळत नसल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. अपघात झालेल्या तरुण सुकळी



येथील रहिवाशी सतीश पांडुरंग मोरे वय अं(२८) असून कामाकरिता गेल्याचे स्पष्ट झाले, अपघात हा तरुणाची दुचाकी महामंडळाच्या एसटी बसला धडकल्याने झाले. तरुणाचे यवतमाळ येथे दुपारी 3 वाजे पर्यंत प्रथम उपचार करून तदनंतर नागपूर येथे हलविल्याची माहिती कुटुंबियांकडून मिळाली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## महिलेच्या 2.20 लाखाच्या दागिन्याची लूट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

चेन स्नॅचींग करणाऱ्या लुटारूंनी कुटुंबियासह रस्त्याने पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील तब्बल 2 लाख 20 हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि चैन लुटून नेल्याची घटना खारघर, सेक्टर-35 ई भागात घडली.

या घटनेतील तक्रारदार पार्थीबन चंद्रशेखर (32) खारघर, सेक्टर-35 मध्ये कुटुंबासह रहाण्यास आहे. पार्थीबन पत्नी, मुलगा आणि आई कालीश्वरी (55) या सर्वांना घेऊन नाष्टा करण्यासाठी जात होता. यावेळी ते सर्वजण पायी चालत खारघर, सेक्टर-35 ई मधील स्टेटस् विहार सोसायटी समोर आले होते. यावेळी पार्थीबन काही अंतर पुढे चालत असताना, त्यांच्या पाठीमागून भरधाव मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा लुटारुंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारुने पार्थीबेन याच्या आईच्या गळ्यातील 1 लाख 80 हजार रुपये किंमतीचे 64 ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि 40 हजार रुपये किंमतीची 16 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन खेचली. त्यानंतर दोघा लुटारुंनी पलायन केले. यावेळी आई कालीश्वरी यांनी आरडा-ओरड केल्यानंतर पार्थीबेन याने सदर लुटारुंचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघे लुटारु मोटारसायकलवरुन साई आयकों न बिल्डींगच्या दिशेने पसार झाले. या घटनेनंतर त्यांनी खारघर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

खारघरमध्ये खुनाची भीती दाखवून ज्येष्ठ नागरिकाला लुटल्याची घटना सेक्टर 14 येथील मशीद मार्गाजवळ घडली आहे.
या घटनेत ज्येष्ठ नागरिकाच्या अंगावरील सोनसाखळी आणि अंगठी भामट्यांनी लांबवली आहे. खारघर बसाहतीमध्ये एकट्या ज्येष्ठ नागरिकांना हेरून त्यांना गुन्हेगारांची भीती दाखवून लुटणारी दुकली फिरत आहे.

## प्रवासात चार लाखांच्या दागिन्यांची झाली चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :**

खासगी वाहनाने महाड ते पनवेल असा प्रवास करणाऱ्या महिलेच्या बागेतून, तीन अनोळखी इसमानी सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना घडली आहे. याबाबत पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आली आहे.
प्रीती जगताप या खासगी वाहनातून महाड ते पनवेल असा प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान प्रीती यांनी बॅग मागील बाजूस ठेवली होती. त्यावेळी त्यांच्यासोबत आणखी काही सहप्रवासी प्रवास करत होते. पनवेलला उतरल्यावर प्रीती यांनी बॅग तपासली असता त्यांना सोन्याचे दागिने आढळून आले नाही. त्यामुळे दागिन्यांची चोरी झाल्याची लक्षात येताच प्रीती यांनी पनवेल शहर पोलिस ठाणे गाठून सोन्याचे मंगळसूत्र, नेकलेस, लक्ष्मीहार, चैन, कानातील साखळी, वेल, दोन सोन्याच्या अंगठ्या, वाळे, कमरेची साखळी, कडा, व घड्याळ असा एकूण 3 लाख 80 हजार रुपयांचा एवज चोरी केला

## पावसाळा अनुषंगाने पनवेल तालुका पोलिसांनी हद्दीतील सरपंच यांची बैठक घेवून केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

सध्या सुरू असलेल्या पावसाळ्याच्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांनी हद्दीतील सरपंच यांची भेट घेवून त्यांना आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले आहे.
त्यामध्ये प्रामुख्याने पोलिस ठाणे हद्दीतील धबधबा ,नदी पात्र, या ठिकाणी पर्यटकाना प्रतिबंध केला आहे. त्या बाबत सूचना फलक, बॅनर लावण्यात आलेले आहे. ग्रामपंचायत तर्फे सुद्धा योग्य ती सतर्कता बाळगावी. अतिवृटी, वादळ वारा या वेळी आम्ही दिलेल्या सूचना गावातील ग्रुप माहिती देऊन नागरिकांना सतर्क करावे. फार्म हाऊस येथे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ते सूचना केल्या आहेत. गावातील धार्मिक स्थळ, शाळा/ कॉलेज, महिला/ मुली, बस स्टॉप, मुख्य रस्ते, महत्वाच्या आस्थापना येथे सुरक्षाचे अनुषंगाने सी सी टी व्ही कॅमेरे लावण्यात यावे. विदेशी नागरिक -बांगला देशी, नायजेरियन नागरिक, इत्यादी माहिती देणे. ग्रामीण भागातील अडीअडचणी यावर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर बैठकीस 18 सरपंच हजर होते.



## कापसाळ येथील पुलावरून पाणी; तीन वाड्यांचा संपर्क तुटला

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी) :**



मुसळधार पावसामुळे कापसाळ येथील शिवनदीवरील पुलावरून पाणी वाहू लागल्याने आणि त्यातच पादचारी साकवावरही वडाचे भलेमोठे झाड कोसळल्याने रविवारी गावातील तीन वाड्यांचा संपर्कच तुटला. पहिल्या पावसातच अशा प्रकारची नैसर्गिक आपत्ती ओढावल्याने ग्रामस्थही भयभीत झाले आहेत. पुलाची उंची कमी आहे. त्यामुळे पावसाचा जोर वाढताच दरवर्षी या गंभीर समस्येला ग्रामस्थांना सामारे जावे लागत असून जीव मुठीत घेऊन विद्यार्थी, महिलांसह वयोवृध्दांना ये-जा करावी लागत आहे. या ठिकाणी नव्याने पूल उभारावा, अशी मागणी गेली कित्येक वर्षे सरपंच सुनिल गोरिवलेंसह कापसाळवासीय करत आहेत. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चिपळूण शहराच्या हाकेवर कापसाळ गाव वसले आहे. या गावातील पायरवाडी, फणसवाडी व गायकरवाडी या तीन वाड्यांमध्ये जवळपास दोन हजार लोकांची वस्ती आहे. तर एक जिल्हा परिषद शाळा, दोन अंगणवाड्या, ग्रामदेवता श्री सुकाई देवीचे मंदिर आहे. महामार्ग ते या वाड्यांना जोडणाऱ्या रस्त्यावर शिवनदीवर कित्येक वर्षांपूर्वी छोटा पूल बांधण्यात आला होता. मात्र, या पुलाची उंची कमी आहे. त्यामुळे पावसाचा काही प्रमाणात जोर वाढला तरीही या पुलावरून पाणी वाहते. तर याच भागात लोखंडी पादचारी साकव आहे. मात्र, या साकवाला साठ ते सत्तर वर्षे झाल्याचे ग्रामस्थ सांगतात. या साकवावर चार ते पाच दिवसांपूर्वी वडाचे झाड कोसळले होते. त्यामुळे साकव नादुरूस्त झाला असून धोकादायक बनला आहे. त्यातच रविवारी कोसळलेल्या पावसात पुलावरून पाणी वाहू लागल्याने मार्ग बंद झाला. परिणामी, ग्रामस्थांसह नोकरदार वर्गाची मोठी अडचण झाली. सरपंच सुनिल गोरिवले यांना याबाबतची माहिती मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून साकवावर कोसळलेले झाड ग्रामस्थांच्या सहकार्यातून बाजूला केले. या रस्त्यावरून पहाटेपासून रात्रीपर्यंत रहदारी असते. त्यामुळे या मार्गावर नव्याने पूल उभारला जावा, अशी मागणी खा. सुनिल तटकरे, ना. अदिती तटकरे यांच्यासह ना. उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

# हवाई सुंदरी मैथिली पाटीलला शेवटचा निरोप; अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

अहमदाबाद येथे नुकत्याच झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यूमुखी पडलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावे गावची सुकन्या, हवाई सुंदरी मैथिली पाटील हिच्या पार्थिवावर आज (मंगळवारी) अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण न्हावा गावावर आणि परिसरात शोककळा पसरली आहे. अंत्यसंस्कारावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह पंचक्रोशीतील हजारों ग्रामस्थांनी मैथिली पाटील हिला श्रद्धांजली वाहिली. कृष्णभक्त मैथिलीला 'राधे राधे' आवाजांनी निरोप देण्यात आला. निरोप देताना सर्वांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा येत होत्या.




१२ जून २०२५ रोजी अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला होता, ज्यात २७४ लोकांचा दुर्दैवी अंत झाला. या मृतांमध्ये मैथिली पाटील चाही समावेश होता. मैथिली ही गेल्या दोन वर्षांपासून एअर इंडियामध्ये हवाईसुंदरी म्हणून कार्यरत होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत तिने आपले हवाईसुंदरी होण्याचे स्वप्न पूर्ण केले होते. तिच्या या यशाने अनेकांना प्रेरणा मिळाली होती. विमान दुर्घटनेची बातमी कळताच तिच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला. मैथिलीच्या पार्थिवाच्या निश्चितीसाठी डीएनए चाचणी करावी लागली. मंगळवारी सकाळी तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे मैथिलीच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गाव तिच्या आठवणीत हळहळ व्यक्त करत आहे. मैथिली पाटील हिचा अपघाती मृत्यू ही केवळ तिच्या कुटुंबीयांसाठीच नव्हे, तर संपूर्ण गावासाठी, आणि हवाईसेवेतील तिच्या सहकाऱ्यांसाठीही एक मोठी दुःखद घटना आहे. एका ग्रामीण भागातून संघर्ष करत, आपल्या कष्टाच्या जोरावर हवाईसुंदरी होण्याचे तिचे स्वप्न पूर्ण करणे हे खरंच प्रेरणादायी होते. "संकटांशी झुंज देत, आकाशाला गवसणी घालणारी मैथिली आज आमच्यात नाही, यावर विश्वास बसत नाही. तिचं तेजस्वी हास्य, तिचं संघर्षमय आयुष्य आणि तिने मिळवलेली यशोगाथा ही कायम आमच्या आठवणीत जिवंत राहील. सर्व ग्रामस्थ आणि आम्ही मैथिलीच्या कुटुंबाच्या पाठीशी कायम राहू, अशी प्रतिक्रिया आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी श्रद्धांजली अर्पण करताना दिली.

# घाऊक महागाईचा १४ महिन्यांचा नीचांक

### ■ अन्न आणि इंधनाच्या किमती घसरल्याचा परिणाम ■ मे मध्ये ०.३९ टक्क्यावर
### ■ भू-राजकीय तणावामुळे किमती वाढण्याचा धोका : तज्ज्ञांचा अंदाज

**नवी दिल्ली :** अन्न आणि इंधनाच्या किमती कमी झाल्यामुळे मे महिन्यात घाऊक महागाई निर्देशांक (डब्ल्यूपीआय) १४ महिन्यांच्या नीचांकी ०.३९ टक्क्यावर आला आहे. तथापि, भू-राजकीय तणावामुळे वस्तूंच्या किमती वाढू शकतात, असे तज्ज्ञांनी सांगितले.

घाऊक किंमत निर्देशांक (डब्ल्यूपीआय) आधारित महागाई एप्रिलमध्ये ०.८५ टक्के होती. गेल्या वर्षी मे महिन्यात ती २.७४ टक्के होती.

उद्योग मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, मे महिन्यात महागाई सकारात्मक राहिली आहे कारण अन्न उत्पादने, वीज, इतर उत्पादन, रसायने आणि रासायनिक उत्पादने, इतर वाहतूक उपकरणे आणि अन्न नसलेल्या वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत.

घाऊक किंमत निर्देशांक (डब्ल्यूपीआय) आकडेवारीनुसार, मे महिन्यात अन्न वस्तूंमध्ये १.५६ टक्क्यांची घसरण दिसून आली, तर एप्रिलमध्ये ०.८६ टक्के घसरण झाली होती, ज्यामध्ये भाज्या, कांदा, बटाटा आणि डाळींमध्ये नकारात्मक चलनवाढ दिसून आली.

मे महिन्यात भाज्यांच्या किमतीत २१.६२ टक्के घसरण झाली, जी एप्रिलमध्ये १८.२६ टक्के होती.



इंधन आणि वीज यांच्या किमतीतही मे महिन्यात २.२७ टक्के घसरण झाली, जी एप्रिलमध्ये २.१८ टक्के होती. तथापि, उत्पादित उत्पादनांमध्ये २.०४ टक्के सकारात्मक चलनवाढ दिसून आली, जी एप्रिलमध्ये २.६२ टक्के होती.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) चलनविषयक धोरण तयार करताना प्रामुख्याने किरकोळ महागाईचा विचार करते. गेल्या आठवड्यात जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, मे महिन्यात किरकोळ महागाईचा दर कमी होऊन २.८२ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे, जो मुख्यतः अन्नधान्याच्या किमती कमी झाल्यामुळे झाला आहे. महागाई कमी होत असताना रिझर्व्ह बँकेने या महिन्यात धोरणात्मक व्याजदरात ०.५० टक्क्यांनी घट करून ५.५० टक्क्यांपर्यंत घट केली आहे.

आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या किमती कमी झाल्यामुळे किरकोळ महागाई सौम्य राहण्याची अपेक्षा असल्याने आरबीआयने चालू आर्थिक वर्षासाठी चलनवाढीचा अंदाज ४ टक्क्यांच्या पूर्वीच्या अंदाजापेक्षा ३.७ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. ४ टक्क्यांपेक्षा कमी सरासरी किरकोळ महागाईचा अंदाज अलीकडच्या वर्षांत सर्वात कमी आहे.

'इक्रा'चे वरिष्ठ अर्थशास्त्रज्ञ राहुल अग्रवाल म्हणाले की, घाऊक किंमत निर्देशांकातील घसरण व्यापक होती. त्यामध्ये अन्न, अन्नधान्य उत्पादन, खनिजे आणि इंधन आणि वीज क्षेत्रांनी या महिन्यांमधील महागाईत घट होण्यास हातभार लावला.

नैऋत्य मान्सून लवकर सुरू झाला असला, तरी जूनच्या सुरुवातीला त्याची प्रगती थांबली. १५ जून २०२५ पर्यंत सामान्य पातळीपेक्षा ३१ टक्क्यांनी लक्षणीयरीत्या कमी झाली. पिकांच्या अंदाजासाठी आणि परिणामी, अन्न महागाईसाठी मान्सूनचे तात्पुरते आणि स्थानिक वितरण महत्त्वाचे राहिले आहे, असे अग्रवाल म्हणाले.

### कच्च्या तेलाच्या किमतीत ४.३ टक्क्यांनी वाढ

इस्रायल आणि इराणमधील तणाव वाढल्यानंतर, चालू महिन्यात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, असे 'इक्रा'ने म्हटले आहे. फेब्रुवारीपासून सतत घसरण झाल्यानंतर १ ते १३ जून दरम्यान भारतीय कच्च्या तेलाच्या किमतीत मासिक आधारावर सरासरी ४.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. शिवाय, मे २०२५ च्या तुलनेत या महिन्यात वर्षानुवर्षे होणाऱ्या घसरणीचे प्रमाणही कमी झाले आहे. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने, तसेच अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयामध्ये काही प्रमाणात घसरण झाल्याने, जून २०२५ च्या घाऊक किंमत निर्देशांकावर दबाव वाढेल, जो जून २०२५ मध्ये ०.६-०.८ टक्क्यांच्या आसपास सौम्य राहण्याची शक्यता आहे, असे अग्रवाल म्हणाले. घाऊक महागाईतील घसरणीमुळे व्यवसायाची भावना वाढेल. कारण त्यामुळे उत्पादन खर्च कमी होईल, असे उद्योग चेंबर पीएचडीसीसीआयने म्हटले आहे.

## जिल्हा परिषद अंतर्गत डांबरीकरण आणि ग्रामपंचायत अंतर्गत सीसी रस्त्याचे व नालीचे काम निकृष्ट दर्जाचे..

### गुत्तेदार झाले मालामाल गावकऱ्यांचे बेहाल

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनीधी/ माधव काईतवाड बोरगडीकर**

नांदेडः-मुदखेड तालुक्यातील मौजे चिलपिंपरी येथे जिल्हा परिषद अंतर्गत चिलपिंपरी ते टाकळी पाटी या रस्त्याचे डांबरीकरण चालू असून. रस्त्याच्या दोन्ही साईटच्या काटेरी झुडूपे न तोडताच रोड मध्ये आलेले झाडे सुद्धा न काढताच नाली न काढताच कामाला सुरू केले आहे गावकऱ्यांनी त्यांना दोन्ही साईडच्या नाला काढून दोन्ही साईटच्या झाडे झुडपे तोडून नंतर कामाला सुरुवात करा असे सांगले असता आम्हाला तुम्ही काही सांगू नका कसं काम करायचं ते आम्हाला माहिती आहे आम्ही काम असेच करू कोणाला सांगायचं ते जाऊन सांगा असे बोलत आहेत. काम चालू असताना साईडने दुसरे वाहन गेले असता रस्ता आत्ताच उकळत आहे. हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असता जिथे कुठे रस्ता उकळत असेल त्याचे पुन्हा काम करू असे बोलत आहेत. पण होत असलेलेच काम व्यवस्थित करत नाहीत याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. डांबरीकरण रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम होत आहे असे आमदार श्रीजया चव्हाण आणि BDO देशमुख साहेबांना भ्रमणध्वनी करून पत्रकार राहुल



कोलते यांनी सांगितले ग्रामपंचायत अंतर्गत नाली आणि सीसी रस्त्याचे काम चालू असून ते निकृष्ट दर्जाचे होत आहे गावकऱ्यांनी वारंवार सांगून सुद्धा गुत्तेदारांना काही फरक पडत नाही रस्त्याची आणि नाल्यांची काम दोन महिन्यापासून रखडलेले आहे. उन्हाळ्यात काम सुरु करून सुद्धा अजुन काम पूर्ण झालेले नाही. अर्धवट झालेल्या कामा मुळे लोकांना ये जा करतांना त्याचा खुप त्रास होत आहे. गावकऱ्यांची एकच विनंती आहे की शासनाने याकडे लक्ष देऊन अर्धवट राहिलेलं काम पूर्ण का झाले नाही याची विचारणा करावी आणि राहिलेलं काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सांगावे. नाल्याचे आणि रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून यांचे सुद्धा चौकशी करावी नाली चे काम चालू असतानाच नाल्या उललेल्या दिसत आहेत. अनेक ठिकाणी ठिकाणी नाल्या अर्धवट सोडून तिथेच काम थांबवलं आहे. हे काम पूर्ण का झाला नाही यांची सुद्धा शासनाने चौकशी करावी. पावसाळ्यापूर्वी जर काम नाही झाले तर येणाऱ्या पावसाचे पाणी अनेक नागरिकांच्या घरात पाणी जाण्याची जास्त भीती आहे. चिलपिंपरी गावामध्ये विकास कामासाठी शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध केला जातो. पण एकही काम नीट होत नसून शासनाच्या निधीचा मोठा फायदा गुत्तेदारांना मात्र नक्कीच होत आहे असे गावकऱ्यांमध्ये बोलले जात आहे.

# मोटारसायकल चोरी व जबरी चोरी करणाऱ्या सराईत आरोपींना खांदेश्वर पोलिसांनी केले जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

पनवेल परिसरासह खांदेश्वर परिसरात मोटार सायकल चोरी व जबरी चोरी करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना खांदेश्वर पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्याकडून 4 गुन्हे उघडकीस आणले आहेत.
परिमंडळ 2 मधील नवीन पनवेल, पनवेल या भागांमधुन मागील बऱ्याच दिवसांपासुन मोटार सायकल व जबरीने सोन्याच्या चेन चोरीच्या घटना वारंवार घडत होत्या. मोटारवाहन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली होती. पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय येनपुरे, अति. पोलीस आयुक्त (गुन्हे) दिपक साकोरे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-2 प्रशांत मोहीते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, अशोक राजपुत यांनी वारंवार गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या मिटींग घेवुन मोटारवाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या होत्या. खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत मोटारसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती स्मिता ढाकणे, पोनि (गुन्हे) सचिन परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सपोनि शरद बरकडे व सपोनि प्रतापराव बंडगर यांच्यासह पोहवा महेश कांबळे, भाऊराव बाचकर, धीरेंद्र पाटील, उदय देसाई, पोना मुबारक तडवी, पोशि सचिन सरगर, सचिन पवार, युवराज शिवगुंडे, रुषीकांत परदेशी, विकास कामनुरकर, संदीप तरटे आदींच्या पथकांनी सर्व मोटारसायकल चोरीच्या घटनास्थळांवरील तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील चैन स्नॅचिंगच्या घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज एकत्रित करुन त्याचा सखोल अभ्यास करुन रेकॉर्डवरील आरोपी निष्पन्न केले. त्यानुसार पंचशील नगर झोपडपट्टी परिसरात सापळा लावुन आरोपी आकाश गोपाळ गाडे, वय-23 वर्षे विचुंबे, व सुरज मारुती देवरे, वय 22 वर्षे, नवीन पनवेल यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कसुन विचारपुस केली असता, त्यांनी मोटारसायकल चोरी व चैन स्नॅचिंग करत असल्याचे कबुल केले. तसेच नमुद आरोपींनी चोरी केलेल्या गाड्या बेवारस स्थितीत सोडुन दिल्या असल्याचे सांगितले. नमुद आरोपींना अटक करुन त्यांच्याकडुन आतापर्यंत एकुण 3 मोटारसायकल व 30 ग्रॅम वजनाच्या 2 सोन्याच्या चैन असा एकुण किं. रु. 2,35,000/- चा मुद्देमाल हस्तगत करुन 4 गुन्हे उघडकीस आणण्यात खांदेश्वर पोलीसांना यश प्राप्त झाले आहे. अटक आरोपींकडे अद्याप तपास चालु आहे.

